# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)


**दूरध्वनी क्रमांक :**
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : **www.unipune.ac.in**
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in


संदर्भ : सीसीओ / ३०३

दिनांक : 05/04/2016

सर्व प्राचार्य / सचिव
संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून तासिका तत्वावरील प्रस्ताव दि. १ जुलै ते दि. ३१ जुलै व दि. १ डिसेंबर ते दि. ३१ डिसेंबर या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकांसंदर्भातील परिनियम ४१५ मध्ये संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांमधील रिक्त शिक्षकी पदे कायमस्वरूपी भरण्याची तरतूद नमूद केलेली आहे व तात्पुरत्या स्वरूपामध्ये म्हणजेच जी पदे एका सत्रापेक्षा जास्त परंतु एक वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी भरावयाची पदे ही स्थानिक निवड समितीमार्फत भरण्यासंदर्भातील तरतूद परिनियम ४१५ (३) मध्ये नमूद केलेली आहे. परंतु काही महाविद्यालयांमध्ये शिक्षकांचा कार्यभार हा नियमित कार्यभारापेक्षा कमी कालावधीचा असल्याने त्यांची पदे शासनाकडून तपासून घेऊन स्थानिक निवड समिती घेऊन सदर पदे ही तासिका तत्वावर (CHB) भरण्यात येतात. गेली अनेक वर्षे अशा स्वरूपाची पदे भरण्याची कार्यवाही ही संपूर्ण वर्षभर महाविद्यालयामध्ये करण्यात येते. वास्तविक पाहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून अशी पदे भरण्यात येतात.

आपणास कळविण्यात येते की, यापुढे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून तासिका तत्वावर नियुक्त झालेल्या पहिल्या सत्रातील उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. १ जुलै ते दि. ३१ जुलै व दुस-या सत्रातील तासिका तत्वावरील उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दि. १ डिसेंबर ते दि. ३१ डिसेंबर या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची हार्डकॉपी या विभागात सादर करण्यात यावी. सदर तारखेनंतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)